22-04-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 21-04-2025 21:07 Page 1



## निवडक

### न्हावेली साखळी येथील बेताळ देवाचा उद्यापासून स्थापनोत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड



**साखळी, दि. २१** : न्हावेली साखळी येथील श्री बेताळ देवाचा स्थापनोत्सव बुधवार दि. २३ ते शुक्रवार दि. २५ रोजीपर्यंत विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा होणार आहे.
यानिमित्त बुधवार दि. २३ रोजी सकाळी ९ वाजता गणेशपूजन, पुण्याहवाचन, लघुरुद्र, महाअभिषेक दुपारी १२.३० वाजता महाआरती, महागाऱ्हाणे, तीर्थप्रसाद व महाप्रसाद होईल. संध्याकाळी ४ वाजता श्री लक्ष्मीनारायण कला सांस्कृतिक मंडळ यांचा हरिपाठ होईल. संध्याकाळी ६ वाजता स्थानिक कलाकारांचा भजनाचा कार्यक्रम होणार आहे. रात्री १०.३० वाजता वाठारेश्वर महिला नाट्यमंडळ भरोणीवाडा न्हावेलीतर्फे रवींद्र चोडणकर लिखित नाटक 'जय शिवशंकर' सादर करण्यात येणार आहे.
गुरुवार दि. २४ रोजी रात्री १०.३० वाजता लक्ष्मीनारायण हौशी नाट्य मंडळ न्हावेलीतर्फे तीन अंकी,कमलाकांत बोरकर लिखित सामाजिक नाटक 'हिरवा चूडा' सादर करण्यात येणार असून, शुक्रवार दि. २५ रोजी रात्री १०. ३० वाजता श्री रवळनाथ भजनी मंडळ दुरीगवाडा न्हावेलीतर्फे दोन अंकी रविंद्र शिवा चोडणकर लिखित ऐतिहासिक 'पन्हाळा सांगे शौर्यगाथा' हे नाटक सादर करण्यात येणार आहे. तरी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे देवस्थान कमिटी न्हावेलीतर्फे कळविण्यात आले आहे.

---

### गोरोबा काका पुण्यतिथीनिमित्त २६ पासून विविध कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. २१** : गोव्याच्या सीमेलगत असलेल्या दोडामार्ग तालुक्यातील आयी कुंभारवाडी येथील श्री संतश्रेष्ठ गोरोबा काका कुंभार मंदिरात शनिवार दि. २६ व रविवार दि. २७ रोजी गोरोबा काका पुण्यतिथी उत्सव उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या निमित्त दोन्ही दिवशी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.
शनिवार दि. २६ रोजी सकाळी ९ वाजता श्रींचे पूजन व गोरोबाकाका मूर्ती पूजन, सकाळी १० वाजता श्री सत्यनारायण महापूजा, आरती व तीर्थप्रसाद, दुपारी १२ वाजता महाप्रसाद, संध्याकाळी ४ वाजता श्री पारवडेश्वर महिला भजनी मंडळ केरी सत्तरीचा भजनाचा कार्यक्रम,संध्याकाळी ५.३० वाजता स्थानिक ग्रामस्थांचा भजनाचा कार्यक्रम, संध्याकाळी ७ वाजता संत गोरा कुंभार दिंडी पथक आयी कुंभारवाडी यांचा दिंडीचा कार्यक्रम, रात्री ९.३० वाजता सिद्धिविनायक दशावतारी नाट्य मंडळ पिकुळे यांच्यातर्फे उदय लाड यांच्या संकल्पनेतून साकारलेले 'मायाजाल' हे दशावतारी नाटक सादर करण्यात येणार आहे.
रविवार दि. २७ रोजी सकाळी १० वाजता कै. विश्वनाथ ना. शेटकर यांच्या स्मरणार्थ प्रशांत शेटकर पुरस्कृत तसेच हरी शेटकर व शंभू एकावडे पुरस्कृत आयी गाव मर्यादित रांगोळी स्पर्धा, संध्याकाळी ४ वाजता स्पर्धात्मक कार्यक्रम, ७ वाजता कै. विश्वनाथ ना.शेटकर यांच्या स्मरणार्थ प्रशांत शेटकर पुरस्कृत तसेच रुपेश ठाकूर पुरस्कृत वेशभूषा स्पर्धा, ७.३० वाजता पारितोषिक वितरण सोहळा होणार असून या कार्यक्रमाला मये मतदार संघाचे आमदार तथा फलोत्पादन महामंडळाचे अध्यक्ष प्रेमेंद्र शेट, माजी जिल्हा उपाध्यक्ष जि.प. सिंधुदुर्ग राजेंद्र म्हापसेकर, माजी पंचायत समिती सदस्य बाबुराव धुरी, शिवसेना दोडामार्ग तालुका अध्यक्ष गणेशप्रसाद गवस, संत गोरा कुंभार उत्कर्ष मंडळ सिंधुदुर्गचे जिल्हा अध्यक्ष नारायण साळवी, आयी ग्रामपंचायत सरपंच तुषार नाईक, झरेबांबर ग्रामपंचायतीचे सरपंच तसेच संत गोरा कुंभार उत्कर्ष मंडळ सिंधुदुर्गचे कार्याध्यक्ष अनिल द.शेटकर,कुंभार समाज युवा मंच गोवाचे अध्यक्ष राघोबा लवू पेडणेकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. रात्री ८ वाजता कलाविष्कार कार्यक्रम होणार आहे, असे आयी कुंभारवाडी ग्रामस्थ मंडळी व फ्रेंड्स युवा मंच आयीतर्फे कळविण्यात आले आहे.

---

### न्हावेली येथे स्वामी समर्थ नूतन मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा



■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. २१** : फणसवाडी नावेली साखळी येथील श्री स्वामी समर्थ नूतन मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा मंगल मय वातावरणात भाविकांच्या मोठया उपस्थितीत झाला.
श्री स्वामी समर्थ नूतन मूर्ती प्राण प्रतिष्ठा सकाळी १०.१० वाजता करण्यात आली.
यानिमित्त चार दिवस विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.
रविवार २० रोजी सकाळी ७ वाजता शांतीपाठ मंगलाचरण मधुपर्क पूजन श्री श्री वल्लभानंद सरस्वती श्री क्षेत्र गाणगापूर यांच्या करकमलांनी झाले. श्री स्वामी समर्थ मंदिर फणसवाडी नावेली संयोजक तथा गोवा राज्याचे माननीय मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, सुलक्षणा सावंत या यांच्यातर्फे शिखर कलश महापूजन करण्यात आले. सरपंच तसेच संस्थापक अध्यक्ष स्वामी समर्थ मंदिर फणसवाडी नावेली रोहिदास कानसेकर ग्राम पुरोहित व सचिव सचिन आपटे यांच्या उपस्थितीत धार्मिक विधी झाले.
श्री स्वामी समर्थ नूतन मूर्ती प्राणप्रतिष्ठाकार्यक्रम सकाळी १०.१० वाजता श्री स्वामी समर्थ अक्कलकोट येथील जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले संस्थापक तसेच अध्यक्ष श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ अक्कलकोट व त्यांच्या विश्वस्त मंडळ अक्कलकोट यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.
दुपारी १ वाजता आरती १.३० वाजता महाप्रसाद झाला. सायंकाळी महिलातर्फे दीपोत्सव व श्री स्वामी समर्थ भक्तांकडून पालखी मिरवणूक काढण्यात आली. सायंकाळी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत व मंदिर समितीतर्फे सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला. त्या नंतर श्री स्वामी समर्थांच्या चरित्रावर आधारित नाट्यप्रयोग अनंतकोटी सादर करण्यात आले.

---

### केरी-सत्तरीत २७ रोजी रक्तदान शिबिर

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. २१** : श्री शारदा स्पोर्ट्स अँड कल्चरल समिती केरी सत्तरीतर्फे आमदार डॉ. देविया वि. राणे यांच्या वाढदिवसानिमित्त गोवा मेडिकल कॉलेजच्या सहकार्याने रविवार दि. २७ रोजी रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. सदर शिबिर सरकारी प्राथमिक विद्यालय केरी-सत्तरी येथे सकाळी १० ते दुपारी १.३० या वेळेत होईल.
सर्व हितचिंतक, रक्तदाते यांनी मोठ्या संख्येने शिबिरात सहभाग घ्यावा आणि रक्तदान करावे अशी विनंती श्री शारदा स्पोर्ट्स अँड कल्चरल समितीतर्फे करण्यात आली आहे.
नावनोंदणी आणि अधिक माहितीसाठी समितीचे संयोजक शुभम पार्सेकर (७५०७३९२९६४) यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन समितीचे अध्यक्ष चंदन माजिक यांनी केले आहे.

# लखनऊ पराभवाचा वचपा काढणार?

## दिल्लीविरुद्ध आज रंगणार सामना | निकोलस पूरनचे असणार दिल्लीसमोर आव्हान

**लखनऊ, दि. २१ :**



इंडियन प्रीमियर लीगचा १८ वा हंगाम आता एका रोमांचक टप्प्यात पोहोचला आहे. आयपीएलचा ४० वा सामना उद्या मंगळवारी, दि. २२ रोजी लखनऊच्या एकाना स्टेडियमवर संध्याकाळी ७.३० वाजता खेळला जाईल. या सामन्यात लखनऊ सुपर जायंट्सचा सामना दिल्ली कॅपिटल्सशी होईल. या हंगामात या दोन्ही संघांमध्ये खेळलेला सामना दिल्लीने जिंकला होता. अशा परिस्थितीत,लखनऊ सुपर जायंट्स दिल्लीकडून मागील पराभवाचा बदला घेण्याच्या इराद्याने मैदानात उतरणार आहे.

दिल्लीने आतापर्यंत फाफ डू प्लेसिस, जेक फ्रेझर-मॅकगर्क, अभिषेक पोरेल आणि करुण नायर यांना सलामीवीर म्हणून आजमावले आहे, परंतु त्यांना अपेक्षित निकाल मिळालेले नाही. डू प्लेसिसच्या दुखापतीशी देखील संबंधित आहे आणि या सामन्यापूर्वी दक्षिण आफ्रिकेच्या खेळाडूच्या तंदुरुस्तीवर बारकाईने लक्ष ठेवले जाईल. दिल्लीच्या सलामीवीरांच्या कामगिरीकडे आतापर्यंत फारसे लक्ष गेलेले नाही. कारण संघाने सातपैकी पाच सामने जिंकले आहेत आणि केएल राहुलच्या उपस्थितीने मधल्याफळीने चांगली कामगिरी केली आहे, परंतु, लखनऊ संघाकडे दिग्वेश राठी, रवी बिश्नोई, आवेश खान आणि शार्दुल ठाकूरसारखे कुशल गोलंदाज आहेत ज्यांच्याविरुद्ध दिल्लीच्या फलंदाजांना सावधगिरीने खेळावे लागेल. आवेश खानच्या डेथ ओव्हर्समध्ये शानदार गोलंदाजीमुळे लखनऊने गेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सचा दोन धावांनी पराभव केला, ज्यामुळे त्याच्या संघाचे मनोबल निश्चितच वाढेल. याद्वारे त्याच्या संघाने दाखवून दिले की तो कोणत्याही परिस्थितीत जिंकू शकतो.

याउलट, लखनऊ संघाकडे मिशेल मार्श, निकोलस पूरन आणि एडेन मार्करामच्या रूपात वरच्या फळीत तीन मजबूत फलंदाज आहेत, ज्यांनी आतापर्यंत आपल्या चांगल्या कामगिरीने संघाला विजयाकडे नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. दिल्ली आणि लखनऊने आतापर्यंत चांगली कामगिरी केली आहे आणि १०-१० गुण मिळवले आहेत. परंतु दोन्ही संघांच्या कर्णधारांची कामगिरी आतापर्यंत चांगली झालेली नाही. रिषभ पंतचा धावा करण्यासाठी होणारा संघर्ष हा लखनऊसाठी चिंतेचा विषय आहे. त्याने आतापर्यंत आठ सामन्यांमध्ये फक्त १०६ धावा केल्या आहेत, ज्यामध्ये ६३ धावांचा समावेश आहे. त्याचा स्ट्राईक रेट ९८ आहे, जो चिंतेचा विषय आहे. दिल्लीविरुद्ध, पंतला मिचेल स्टार्क, कुलदीप यादव, विपराज निगम आणि मुकेश कुमार यांच्यासारख्या जबरदस्त गोलंदाजांचा सामना करावा लागेल. दिल्लीचा कर्णधार अक्षर पटेललाही आतापर्यंत अपेक्षेनुसार कामगिरी करता आलेली नाही. फलंदाजीत त्याने १५९ च्या स्ट्राईक रेटने १४० धावा केल्या आहेत, पण त्याची गोलंदाजी चिंतेचा विषय आहे. त्याने आतापर्यंत सात सामन्यांमध्ये फक्त एकच विकेट घेतली आहे आणि त्याचा इकॉनॉमी रेट ९.३६ आहे.

**संभाव्य प्रतिस्पर्धी संघ :**

**लखनऊ सुपर जायंट्स : रिषभ पंत, एडन मार्कराम, मिचेल मार्श, निकोलस पूरन, आयुष बडोनी, अब्दुल समद, डेव्हिड मिलर, शार्दुल ठाकूर, आवेश खान, आकाश दीप, दिग्वेश सिंग राठी, रवी बिश्नोई, प्रिन्स यादव, शाहबाज अहमद, मॅथ्यू ब्रेट्झके, हिम्मत सिंग.**

---

**दिल्ली कॅपिटल्स: अक्षर पटेल (कर्णधार), जेक फ्रेझर-मॅकगर्क, अभिषेक पोरेल, करुण नायर, केएल राहुल, ट्रिस्टन स्टब्स, आशुतोष शर्मा, विपराज निगम, मिचेल स्टार्क, कुलदीप यादव, मोहित शर्मा, मुकेश कुमार, समीर रिझवी, फाफ डु प्लेसिस, मुकेश कुमार, समीर रिझवी.**

# 'वाचाल तर वाचाल !' पुस्तकाचे प्रकाशन



**मडगाव : 'वाचाल तर वाचाल !... या पुस्तकाचे प्रकाशन प्रसंगी सुमिरन आमोणकर, प्रणीत आमोणकर, निशी आमोणकर, कविता आमोणकर, मनस्विनी प्रभुणे नायक, प्रा. अनिल सामंत, कविता बोरकर व शर्मिला प्रभू.**

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २१** : गोव्यामध्ये अलीकडच्या वेगवेगळ्या प्रकारचे मौलिक लेखन केले जात आहे. चांगली पुस्तके प्रकाशित केली जात आहेत. त्या पुस्तकाची मौलिकता कविता आमोणकर यांच्या 'वाचाल तर वाचाल !'.. या पुस्तकात आहे. या पुस्तकातील परीक्षणे वाचल्यावर ती पुस्तके जारी वाचली नसतील, तरी कोणकोणत्या विषयावर पुस्तके लिहिली जात आहेत ? त्या त्या पुस्तकात काय वेगळेपण आहे? याची उत्सुकता वाढत जाते. आणि परीक्षणे लिहिलेली आहेत. ती पुस्तके वाचण्याची आवड निर्माण होते. असे प्रतिपादन गोवा मराठी अकादमी चे अध्यक्ष प्रा. अनिल सामंत यांनी मडगाव नगरपालिका येथे केले.लेखिका आणि पत्रकार कविता आमोणकर यांच्या वाचाल तर वाचाल !... या पुस्तक प्रकाशनाच्या समारंभात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर लेखिका, साहित्यिक मनस्विनी प्रभुणे नायक , अशोक बोरकर काव्य मैफलीच्या संस्थापिका कविता बोरकर तसेच श्री बलराम रेसिडेंशिअल हायस्कूल च्या मुख्याध्यापिका आणि संचालिका सविता तवडकर यांची उपस्थिती होती कविता आमोणकर यांचे हे पाचवे पुस्तक आहे. या पुस्तकाला सुशांत तांडेल यांची प्रस्तावना लाभली असून या पुस्तकात विविध विषयावरील २८ पुस्तकावर लिहिलेली परीक्षणे आहेत .गोवा मराठी गोवा मराठी अकादमी ने गेल्या वर्षी ९० पुस्तके प्रकाशित केली. या वर्षी तर मराठी भाषेतील ४५ पुस्तके प्रकाशित झाली असून केवळ याच या महिन्यात ६ मराठी पुस्तकांचे प्रकाशन झाले आहे. या महिन्यात ६ मराठी पुस्तकांचे प्रकाशन झाले आहे, अशी माहिती अनिल सामंत यांनी यावेळेस दिली.

डिजिटल तंत्रज्ञानाच्या युगात आज प्रसार माध्यमावर उपलब्ध करून देणायात येत असल्याने पुस्तके आत छापावीत की नाहीत, हा प्रश्न निर्माण झाला असला तरी हातात पुस्तके घेऊन वाचण्याची गोडी काही वेगळीच आहे. असे उद्गार मनस्विनी प्रभुणे यांनी काढले.वाचनातून मिळालेले अनुभव हे माणसाला आणि माणसाचे जीवन समृद्ध करतात. असे कविता बोरकर यांनी सांगितले.

सविता तवडकर यांनी आपले विचार मांडताना सांगितले की, पुस्तके हा आपल्या जीवनाचा एक भाग असून पुस्तके वाचयाची सवय लावून घायला हवी. लेखिका कविता आमोणकर यांनी ही आपले मनोगत यावेळी व्यक्त केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शर्मिला प्रभू यांनी केले. अनुया शिरोडकर यांनी इश्स्तवन सादर केले. आभार वैशाली व्हरखट यांनी मानले.

# पेडणेत 'स्वर संध्या' कार्यक्रम उत्साहात



**पेडणे : गुरुनाथ परब यांचा गौरव करताना नागेश गोसावी व इतर.**

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २१** : श्री वंसदेव प्रसन्न कासारवडणे, पेडणे येथे वार्षिक सत्यनारायण पूजा प्रित्यर्थ आयोजित करण्यात आलेल्या 'स्वर संध्या' कार्यक्रमात मोठा उत्साह दिसून आला. उद्घाटनानंतर ज्येष्ठ कलाकार गुरुनाथ परब आणि रामचंद्र शेटकर यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अनुषंगाने गायनाचा कार्यक्रम आयोजित केला गेला, ज्यामध्ये गायक गोविंद मराठे आणि सुरेश केरकर यांनी आपल्या गायनाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. त्यामध्ये श्री विकास नाईक यांनी तबला साथ दिली. तर संवादिनीसाठी कुमारी लोचन च्यारी आणि ऑर्गनसाठी संकेत संतोष शेटकर यांनी साथ केली. मंजिरीबरोबर साथ करणारे अनिल गाठ यांनी देखील योगदान दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष शेटकर यांनी केले. कार्यक्रमात उपस्थितांमध्ये गडद उत्साह पाहण्यास मिळाला आणि सगळ्यांनी मिलिंद संगीताच्या आनंदाचा अनुभव घेतला.

# 'भक्तिरंग' कार्यक्रमातून प्रेक्षकांची मने जिंकली

■ टीम दैनिक हेराल्ड



**मोरजी : नाट्यरंभ स्कूल ऑफ आर्ट्सचे विद्यार्थ्यां. सोबत शिक्षिका वैष्णवी जोशी व देवस्थान पदाधिकारी.**

**पेडणे, दि. २१** : वरचावाडा मोरजी येथील नृत्य शिक्षिका वैष्णवी उमा रघुनाथ जोशी आणि नाट्यरंभ स्कूल ऑफ आर्ट्स च्या विद्यार्थ्यांनी मोरजी फडते कुल येथील श्री सातेरी देवीच्या वर्धापन दिनानिमित्त भक्तिरंग नृत्याचा अविष्कार सादर करून उपस्थित प्रेक्षकांची मनी जिंकली.

नाट्यरंभ स्कूल ऑफ आर्ट्स शेकडो विद्यार्थ्यांनी आतापर्यंत गोव्यात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ सार्वजनिक दुर्गा उत्सव देवतांच्या वर्धापन दिनानिमित्ताने वेगवेगळ्या ठिकाणी दर्जेदार नृत्यविष्कार सादर करून उपस्थितांचे उपस्थितांची मनी जिंकण्या बरोबरच वेगवेगळी नृत्याविष्कार सादर करून अल्पकाळात भरारी घेतलेली आहे.

नृत्य शिक्षिका वैष्णवी उमा रघुनाथ जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली भरतनाट्यम कलेमध्ये शेकडो विद्यार्थी घडवण्याचं काम वैष्णवी जोशी यांनी केले. मोरजी पेडणे शिवोली म्हापसा या ठिकाणी नृत्याचे प्रशिक्षण वर्ग सुरू आहेत .त्यातील काही मोजक्याच नृत्य बालकलाकारांनी २० रोजी श्री सातेरी देवीच्या वर्धापन दिनानिमित्ताने खास भक्तिरंग कार्यक्रम सादर केला.

मानसी शिरोडकर, आरल मोरजे, आशी मोरजे, निर्वि पडते, आद्या फडते, साची राऊत, साची हरमलकर, आर्वी शेटगावकर, करिष्मा शेटगावकर, निशा शिरोडकर, अदिती कोरगावकर, नेहा कोरगावकर, दिव्या ढोणे, सृष्टी सावंत, सृष्टी आश्वेकर, वरदा शेटगावकर, प्रियल पवार, आराध्या दाभोलकर, श्रीया तेमकर, हर्षाली हलनकर, मानवी शेटगावकर,

मनस्वी शेटगावकर, ऐशवर्या वडार, आर्या बांदेकर, शैवी लाड, साईशा चोडणकर, लक्षिका चोडणकर, नंदिशा गावकर, स्मृती सळगावकर, गरिमा साळगावकर, आदी कलाकारांनी नृत्य सादर केले. त्यात गणेश वंदना चामुंडा स्तुती कोळी नृत्य गणेश कौतुकम शारदा स्तुती, शिव स्तुती, देवी स्तुती, सातेरी वंदना, नांदी, वराह रुपम, सूर निरागस हो, त्रिदेवी स्तोत्र सादर केले. सुरुवातीला प्रास्ताविक स्वागत आणि सूत्रसंचालन श्रेया फडते यांनी केले

# श्रेयस-ईशान पुन्हा बीसीसीआयच्या केंद्रीय करारात

## गेल्या वर्षी वगळण्यात आले : रोहित-विराट ए प्लस ग्रेडमध्ये कायम

**मुंबई, दि. २१ :**



श्रेयस अय्यर आणि इशान किशन हे बीसीसीआयच्या केंद्रीय करारात परतले आहेत. गेल्या वर्षी, दोघांनाही बीसीसीआयच्या २०२३-२४ च्या केंद्रीय करारातून वगळण्यात आले होते.

एकदिवसीय आणि कसोटी संघाचे कर्णधार रोहित शर्मा, विराट कोहली आणि रवींद्र जडेजा हे + मध्ये राहतील. गेल्या वर्षी झालेल्या टी-२० विश्वचषकानंतर या तिघांनीही टी-२० फॉरमॅटमधून निवृत्ती घेतली आहे. त्याच वेळी, जसप्रीत बुमराह देखील + ग्रेडमध्ये राहील.

गेल्या वर्षी श्रेयस अय्यर आणि इशान किशन यांना केंद्रीय करारातून वगळण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे देशांतर्गत क्रिकेट न खेळणे. जर एखाद्या खेळाडूचा राष्ट्रीय संघात समावेश नसेल तर त्याने देशांतर्गत क्रिकेट खेळावे, असा आदेश बोर्डाने दिला होता. बोर्डाच्या आदेशानंतरही, श्रेयस अय्यर आणि इशान किशन त्यावेळी उर्वरित रणजी ट्रॉफीमध्ये खेळले नाहीत.

श्रेयसने देशांतर्गत क्रिकेटमध्ये पुनरागमन केले आणि गेल्या रणजी ट्रॉफीमध्ये मुंबईसाठी पाच सामन्यांमध्ये ४८० धावा केल्या. श्रेयस सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये नऊ सामन्यांमध्ये ३४५ धावा करून चौथ्या क्रमांकाचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज होता. विजय हजारे ट्रॉफी हंगामात त्याने शानदार कामगिरी केली, पाच सामन्यांमध्ये त्याने ३२५.०० च्या प्रभावी सरासरीने ३२५ धावा केल्या. अय्यरने २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीच्या ५ डावात ७९.४१ च्या स्ट्राईक रेटने २४३ धावा केल्या. या काळात त्याने दोन अर्धशतकेही झळकावली. त्याने अंतिम सामन्यात ६२ चेंडूत ४८ धावांची खेळी खेळली. तो स्पर्धेतील दुसरा सर्वाधिक धावा करणारा खेळाडू होता.

बोर्डाच्या केंद्रीय करार असलेल्या खेळाडूंमध्ये ३४ खेळाडूंचा समावेश करण्यात आला आहे. गेल्या वर्षी ३० खेळाडूंना केंद्रीय करार देण्यात आला होता. तर ग्रेड + मध्ये गेल्या वर्षीप्रमाणे फक्त चार खेळाडू आहेत. ग्रेड अ मध्ये ६ खेळाडूंचा समावेश करण्यात आला आहे. गेल्या वेळी देखील या श्रेणीत ६ खेळाडू होते. तर ब मध्ये, गेल्या वेळीप्रमाणे, पाच खेळाडू आहेत आणि क मध्ये १९ खेळाडू आहेत. गेल्या वेळी १५ खेळाडूंचा समावेश होता.

अभिषेक शर्मा, नितीश रेड्डी, हर्षित राणा आणि वरुण चक्रवर्ती हे पहिल्यांदाच बीसीसीआयच्या केंद्रीय करारात सामील झाले आहेत. या चौघांचाही क श्रेणीत समावेश करण्यात आला आहे. वरुणने २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये ९ विकेट्स घेतल्या. नितीशने बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीमध्ये त्याच्या कामगिरीने प्रभावित केले. त्याच वेळी, अभिषेक शर्माने २०२४-२५ मध्ये खेळलेल्या १२ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये २००.४८ च्या स्ट्राइक रेटने ४११ धावा केल्या आहेत. या यादीत, मागील केंद्रीय करारात समाविष्ट असलेल्या ५ खेळाडूंना वगळण्यात आले आहे. ज्यामध्ये शार्दुल ठाकूर, रविचंद्रन अश्विन, जितेश शर्मा, केएस भरत आणि आवेश खान यांचा समावेश आहे. ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर बॉर्डर गावस्कर ट्रॉफी दरम्यान अश्विनने निवृत्तीचा निर्णय घेतला होता.

# समाजोन्नती संघटना बार्देश शाखेतर्फे बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी



**म्हापसा : डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती कार्यक्रमात उपस्थितांना संबोधित करताना प्रमुख पाहुणे गुरुदास नाटेकर. बाजूला सुधीर कांदोळकर, शंभू भाऊ बांदेकर, प्रकाश आपा बांदेकर, अरविंद कोरगांवकर, विश्वनाथ साजू कोरगांवकर, समर्थ यदूराम नाटेकर व ध्रुव कुडाळकर.**

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. २१** : समाजोन्नती संघटना बार्देश शाखेतर्फे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती नुकतीच म्हापसा येथील तुळशीराम सभागृह येथे साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून इंदूस्ट्रियालिस्ट आणि साहित्यिक डॉ. गुरुदास भालचंद्र नाटेकर, तर खास निमंत्रित म्हणून नगरसेवक आणि माजी नगराध्यक्ष सुधीर कांदोळकर उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाजोन्नती संघटना मध्यवर्ती समितीचे अध्यक्ष शंभू भाऊ बांदेकर होते.

यावेळी व्यासपीठावर समाजोन्नती संघटना बार्देश शाखेचे अध्यक्ष प्रकाश बांदेकर, सचिव अरविंद कोरगांवकर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरवात दीपप्रजवलाने झाली. प्रकाश आपा बांदेकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विश्वनाथ साजू कोरगांवकर आणि समर्थ यदूराम नाटेकर यांचा सन्मान करण्यात आला.

डॉ. गुरुदास भालचंद्र नाटेकर यांनी भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची माहिती देणारे भाषण झाले. सुधीर कांदोळकर, शंभू भाऊ बांदेकर यांनी यावेळी उपस्थितांना संबोधित केले. तसेच सत्कारमूर्ती विश्वनाथ साजू कोरगावकर आणि समर्थ यदूराम नाटेकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. आभार प्रदर्शन अरविंद कोरगांवकर यांनी केले तर सादर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ध्रुव कुडाळकर यांनी केले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २२९ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 229 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .